नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी गुरुवारी सोलापुरात वाऱ्यासारखी पसरली. या बातमीने प्रत्येक सोलापूरकरांना धक्का बसला. दरम्यान नाना पाटेकर यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलताना नंदाने यांनी पाहिले होते. त्यांचा अभिनय, त्यांची संवादफेक आणि त्यांचा साधा, पण वेगळा अंदाज मनात कायम घर करून राहिला होता. मात्र, त्यांना केवळ पडद्यावर किंवा व्यासपीठावर पाहायचे नव्हते; त्यांना एकदा त्यांच्या आवडत्या वेशभूषेत, अगदी नानांचाच पोशाखात प्रत्यक्ष भेटायचे होते. ही इच्छा नंदाने यांनी मनात सोन वर्षांपासून जपली होती.

नाना पाटेकर यांचा डोक्यावर टोपी, कुर्ता-पायजमा आणि शेला असा पोशाख पाहून सोन पोशाख आपणही घालून त्यांना भेटावे, अशी मनात इच्छा नंदाने यांना नानांच्या निधनाने झाली. त्यासाठी तब्बल दोन वर्षांपूर्वी तो पोशाख शिवूनही घेतला. टोपी, कुर्ता-पायजमा आणि शेला तयार होता. फक्त वाट होती ती नानांसमोर उभे राहण्याची.

ती भेट कधी होणार, यानी आस मनात होती. अखेर दुपारची, ७ ऑक्टोबरला मुंबईतील एका कार्यक्रमासाठी ९ ऑक्टोबर रोजी नाना गोवा भेटण्याचे निमंत्रण नंदाने गोवा आले. या कार्यक्रमाला नाना पाटेकर उपस्थित राहणार होते. त्यामुळे यावेळी नानांना नक्की भेटता येईल. आपल्या जपलेला पोशाखात त्यांच्यासमोर उभे राहता येईल, या विचाराने नंदाने यांचे मन आनंदून गेले. मुंबईला जायचे, कार्यक्रमाला उपस्थित राहायचे आणि नानांची भेट घ्यायची, असा विचार मनात ठेवून नंदाने यांनी फोन ठेवला. पण नियतीला काही वेगळेच मंजूर होते.

दुसऱ्याच दिवशी, गुरुवार, ८ ऑक्टोबरला सकाळी नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर आली. काही क्षणांपूर्वीपर्यंत ज्या व्यक्तीला भेटण्याची स्वप्ने मनात होती, त्याच व्यक्तीच्या निधनाची बातमी वाचावी लागली.

> पोशाख तयार होता, निमंत्रण आले होते, मुंबईची वाट समोर होती. पण भेटीच्या काही वास आधीच नाना निघून गेले. नाना पाटेकर यांच्या निधनाने विश्वपटसृष्टीसह त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. मात्र, काही चाहत्यांच्या मनात त्यांच्या आठवणींसोबत काही अधुरी स्वप्नेही कायमची राहून जातात. माझ्यासाठी नानांची भेट ही अशीच एक अधुरी राहिलेली इच्छा आहे, जिच्यासठी चौन वर्षे जपलेला पोशाख आता आठवणींचा भाग बनून राहिला आहे.
>
> - रोहन नंदाने (कलाकार, सोलापूर)

IBC, २०१६ अंतर्गत ५ व्या ई-लिलाव विक्रीची सूचना
मेसर्स प्रतिभा स्क्वायस्क्रेफर्स प्रायव्हेट लिमिटेड
(परिसमापन प्रक्रियेत)
कार्यालय : प्लॉट क्रमांक ४९-५०, राघवगा, ता. करवीर, कोल्हापूर ४१६ ००५, महाराष्ट्र, भारत

IBC, २०१६ च्या कलम ३५ (एक) अन्वये आणि IBBI (लिक्विडेशन प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम १२ व अनुसूची I यांच्या संयुक्त वाचनानुसार, लिक्विडेटर 'मेसर्स प्रतिभा स्क्वायस्क्रेफर्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या 'लिक्विडेशन इस्टेट'चा (परिसमापन मालमत्ता संज्ञेचा) भाग असलेल्या खालील मालमत्तेच्या विक्रीसाठी https://ibbi.baanknet.com या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निविदा आमंत्रित केल्या आहेत.

परिसमापन नियमावलीच्या नियम ३२(ई) ते (ग) अन्वये विक्री करावयाच्या मालमत्तेचा तपशील	लिक्विडेटर पद्धत	रु. राखीव किंमत	इसारा रक्कम	वाढीव बोलीची रक्कम (रु.)
१. जमीन : खुली NA जमीन ३९६७०.८० चौ. मीटर मोकळ्या असलेले २९७ प्लॉट, गेट क्रमांक १८३, डेकणी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र	IBBI (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ३३ (अ) अन्वये कॉर्पोरेट कार्यालयाच्या मालमत्तेची विक्री.	२,४१,०१,०२५	२४,१०,१०२.५	१०,००,०००
२. रोपे आणि विशेष मालमत्ता (SFA)	IBBI (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ३० अ अंतर्गत सहायाने रोपांच्या मूल्यांकन व करता येणारी मालमत्ता.	१,०९,७०,१५१.१७	१०,९७,०१५.१२	१,००,०००
इसारा रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख		२४.१०.२०२६		
ई-लिलावाची तारीख आणि वेळ		३०.१०.२०२६ (सा. १०.०० ते दु. १२.००)		

१. इच्छुक अर्जदार ऑनलाइन ई-लिलावाच्या माध्यमा अटी व शर्ती, बोली (BID) अर्ज, पात्रता निकष, बोलीदारांचे मार्गदर्शक, ठेवही (EMD) वाटपाबाबत इत्यादींबाबतच्या माहितीसाठी https://ibbi.baanknet.com येथे उपलब्ध असलेल्या ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजाचा संदर्भ घेऊ शकतात.

२. संभाव्य बोलीदारांनी 'इन्स्ट्रुक्शनी ऑफ बॅंकरची कोठडी कलम २१ अ अंतर्गत पात्रतेबाबतच्या हमीपत्रासह आवश्यक कागदपत्रे BAANKNET लिलाव प्लॅटफॉर्म (https://ibbi.baanknet.com) द्वारे सादर करावीत.

३. संभाव्य बोलीदारांनी BAANKNET लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे (https://ibbi.baanknet.com) असामान्य रक्कम जमा करावी.

४. वाढ्यांच्या खंड २ मध्ये वाढ केलेल्या समीक्षक असे वाढ केले जाते की, संभाव्य बोलीदार (prospective bidder) या कोड'च्या (Code) कलम २९ अ अंतर्गत जेथे लागू असेल तेथे कोणत्याही अपात्रतेच्या कलंक येत नाही. संभाव्य बोलीदारांनी याची नोंद घ्यावी की, कोणत्याही रुपाबाब अगाउ आडकाठाम IBBI च्या २८ मार्च २०२५ रोजीच्या परिपत्रक क्र. IBBI/LIQ/84/2025 मुख्य व्यापी एकक (कायदा रक्कम) उच्च केली आहे.

५. कृपया लक्षात घ्या की, एकदा (असामान्य रक्कम) ठरवल्यानी BAANKNET पोर्टलवरील ई-वॉलेटमधे (eWallet) रक्कम जमा करणे आणि संबंधित लिलावामाणी "Participate" (सहभागी व्हा) या पर्यायावर क्लिक करणे आवश्यक आहे. www.baanknet.com या पोर्टलवरील ऑनलाइन ई-लिलावात सहभागी होण्यासाठी पात्र बोलीदारांनी (bidders) तांत्रिक लिक्विडेटरशी (Liquidator) निविदा करून कळवणी जाणीव. इच्छुक बोलीदारांनी लिलाव पोर्टलवर स्वतःचा युजर आयडी (यीशी खाते) आणि पासवर्ड तयार करावा आणि आपली EMD रक्कम पोर्टलवर ई-वॉलेटमधे जमा करावी. ई-लिलाव पोर्टलवरील काही शंका असल्यास BAANKNET (Bank Asset Auction Network) शी संपर्क साधावा; ईमेल आयडी : support.baanknet@psballiance.com, मोबाईल क्रमांक : +91 8291220220

६. बोलीदारांना देय व्यवहार विक्रीच्या अंतिम स्वीकारानंतरची बोलीची रक्कम अधिक इसा लागू कर/शुल्क ज्यातून आणीक प्राप्त झालेली 'ईएमडी' (EMD) वजा/समायोजित केली जाईल; भरला करण्यासाठी 'एलओआय' (LOI) च्या तारखेपासून ९० दिवसांच्या कमाल कालावधी दिला जाते.

७. हे समूह केले जाते की, हे निवेदन संभाव्य बोलीदारांना (bidders) आमंत्रित करण्याच्या उद्देशाने दिले जाते आणि याशुद्धे लिक्विडेटर किंवा कंपनीला विक्री पूर्ण करण्याचे बंधनकारक दायित्व निर्माण होत नाही. लिक्विडेटर प्रक्रियेच्या लिलावाची लिक्विडेटरला ई-लिलावाच्या अटी व शर्ती (कालबद्धतेसह) बाहेरचाच, पुढे ढकलण्याचा, रद्द करण्याचा अटी/किंवा त्यांत बदल किंवा कालबद्धाची कुणी करण्याचा स्वविवेकाधिकार आहे; तसेच लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर बोलीदारी पूर्वसूचना न देता किंवा बोलीदारी कारण न देता बोलीदारी बोली (bid) नाकारण्याचा अधिकार त्यांना आहे.

८. ई-लिलाव केवळ 'जसे आहे तसे', 'जे आहे ते', 'जे काही आहे ते' आणि 'इथे जसे' या तत्वावर आयोजित केला जाईल.

दिनांक : ०९.१०.२०२६
ठिकाण : मुंबई

स्वाक्षरीत/-
कु. जोकिता गौरा पंचियान
लिक्विडेटर : प्रतिभा स्क्वायस्क्रेफर्स प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशनमध्ये)
IBBI Reg. No. IBBI/IPA-002/IP-N00337/2017-18/10941
पत्ता : ३०१, शिखर मजाला, सोमेश भवनसमोर, ग्रॉमिनेत्र मिश्रामध्ये, वसतला, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३.

थोडक्यात महत्त्वाचे

जयसिंगपूर पोलीस ठाण्यामध्ये उपअधीक्षक ज्ञानेश गवई यांच्यासोबत बक्षीस प्राप्त विद्यार्थी व अन्य.

जयसिंगपूर पोलीस ठाण्यात विद्यार्थ्यांचा सत्कार

केसरी वृत्तसेवा

जयसिंगपूर : जायंट्स ग्रुप.. दुर्गा सहेली, जयसिंगपूर गोल्ड सिटी, स्वामिनी सहेली, दिव्या सहेली, स्वप्न सहेली यांच्यावतीने आणि प्रभारी पोलीस उपअधीक्षक ज्ञानेश गवई यांच्या संकल्पनेतून जयसिंगपूरमधील विद्यार्थ्यांसाठी गणेशोत्सव काळात घेतलेल्या स्पर्धेत शहरातील १४ शाळा सहभागी झाल्या. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा जयसिंगपूर पोलीस ठाण्यात झाला. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचा प्रभारी पोलीस उपअधीक्षक ज्ञानेश गवई यांच्या हस्ते करण्यात आला. जायंट्स फेडरेशनच्या डॉ. स्नेहल कुलकर्णी, सुधीर कुलकर्णी, भाग्यश्री जोशी, साजिदा घोरी, रागिणी शर्मा, वृषाली कोळेकर, शर्मिला देशपांडे, कुसुम जगदाळे, ओंकार कुलकर्णी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी अशोक गुंडे, अनिता बंडगर, सुहासिनी कुलकर्णी, भारती पाटील, हेमलता चौगुले, सुजाता पाटील, रेखा गंगधर, स्वाती साळोखे, सुमन निर्मळे, श्रुती जोशी, घनश्याम मानधना, महेंद्र पटेल, पांडुरंग बंडगर यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते..

गडहिंग्लजमध्ये सेवा संकल्प अभियानांतर्गत नागरिक हो जागृत व्हा! या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण केले.

गडहिंग्लजमध्ये नागरिक हो जागृत व्हा! पथनाट्यातून जनजागृतीचा संदेश

केसरी वृत्तसेवा

गडहिंग्लज : जागृती हायस्कूल व रावसाहेबआण्णा कित्तूरकर ज्युनिअर कॉलेज आणि गडहिंग्लज पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा संकल्प अभियान अंतर्गत नागरिक हो जागृत व्हा! या विषयावर प्रभावी पथनाट्याचे सादरीकरण केले. रावसाहेब आण्णा कित्तूरकर ज्युनिअर कॉलेजच्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींनी या पथनाट्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला.या पथनाट्याचे दिग्दर्शन प्रा. शिवाजी पाटील यांनी केले. पथनाट्यातून शासनाच्या योजनांची माहिती, मतदार जागृती, महिला सुरक्षा, गुड टच–बॅड टच, प्लास्टिक प्रदूषण यांसारख्या विषयांवर परखड भाष्य केले. यावेळी श्री. दयानंद कोरवी यांनी प्रास्ताविकातून सेवा संकल्प अभियानाचा हेतू स्पष्ट केला. कार्यक्रमास प्राचार्य उमेश सावंत यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी–कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी शाहूवाडी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर भेट देऊन संवाद साधला.

जिल्हाधिकारी शाहूवाडी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये कमी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी शाहूवाडी तालूक्यातील मौजे मोळावडे येथील शेतकरी रामचंद्र शिवाजी पाटील यांचे शेतावर भुईमूग पिकाची सयाजी शंकर पाटील यांचे शेतावर रताळ्याच्या पिकाची पाहणी केली. मौजे ससेगाव या गावात गुंगा पारळे, तानाजी पारळे, केशव पारळे या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन भात पिकाची पाहणी केली. जिल्हाधिकारी यांनी मोळावडे व ससेगावातील उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधून सध्य स्थितीतील पीक परिस्थिती संदर्भात चर्चा केली. कमी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके वाळून गेल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर विजय राठोड यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला. यावेळी त्यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी डॉ. समीर शिंगटे, निलम चाकणे, मंडळ कृषी अधिकारी संजय तांदळे, अशोक कोळेकर, सरपंच, पोलीस पाटील, शेतकरी, सहायक कृषी अधिकारी, तलाठी आदी उपस्थित होते.

इचलकरंजीत आज महसूल लोकअदालत

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार इचलकरंजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात ९ ऑक्टोबर रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालतीचे आयोजन केले आहे. हातकणंगले व शिरोळ या दोन्ही तालुक्यांतील प्रलंबित महसुली दावे तडजोडीने निकाली काढण्यासाठी या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी दीपक शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महसूल विभागातील प्रलंबित दावे पक्षकारांच्या परस्पर संमतीने व कमी कालावधीत निकाली काढण्याची संधी महसूल लोकअदालतीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ व खर्च वाचून प्रकरणांचा सुलभतेने निपटारा होण्यास मदत होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी दीपक शिंदे यांनी सांगितले.

सदाशिवराव मंडलिक हे कागलच्या राजकीय विद्यापीठातील ज्ञानपीठ

विलासराव पाटील : हमिदवाडा येथील कारखाना कार्यस्थळी अभिवादन कार्यक्रम

केसरी वृत्तसेवा

मुरगूड : सदाशिवराव मंडलिक हे कागलच्या राजकीय विद्यापीठात ज्ञानपीठ जनपीठ आणि संवेदनपीठ होते, असे प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे कार्यकारी अधिकारी , शिक्षण सारथी पुणेचे निवृत्त प्राचार्य विलासराव पाटील यांनी केले.

लोकनेते सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना लि ., हमिदवाडा – कौलगे या कारखान्याच्या कार्यस्थळावर सदाशिवराव मंडलिक यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे चेअरमन व माजी खासदार संजय मंडलिक होते.

पाटील म्हणाले,सदाशिवराव मंडलिक यांच्यासारखा पुरोगामी निर्भय आणि चरित्र व चारित्र्यसंपन्न नेता आजच्या राजकारणात दुर्मिळ आहे. जनता हेच आपले मायबाप आहेत असे दिवंगत मंडलिक म्हणायचे ते म्हणायचे मी विजयासाठी नव्हे कार्यकर्त्यांच्या स्वाभिमानासाठी निवडणूक लढवतोय संकटात संधी शोधणारे आणि संधीच सोनं करणारे ते व्यक्तिमत्त्व होते. यावेळी मंडलिक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे व प्रतिमेचे पूजन विलासराव पाटील चेअरमन संजय मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात चेअरमन संजय मंडलिक यांनी दिवंगत सदाशिवराव मंडलिक यांच्या कार्याची माहिती दिली. यावेळीसदाबझारच्या सभासदांना प्रतिनिधिक स्वरूपात दहा टक्के लाभांशाचे वाटप केले. यावेळी कारखाना कार्यस्थळावर तर केलेल्या रक्तदान शिबिरालाही मोठा प्रतिसाद मिळाला.

गोकुळचे माजी चेअरमन अरुण डोंगळे, चंद्रकात गवळी, अशोकराव फराकटे वाळवे बु. यांनी मंडलिकांच्या प्रतिमेला पुष्पाहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाला मंडलिक कारखान्याचे व्हाईस चेअरमन विश्वासराव कुराडे, आनंदराव फराकटे, ॲड. वीरेंद्र मंडलिक, समरजितसिंह मंडलिक, नामदेवराव मेंडके, रेखाताई मांगले, जयसिंग भोसले, नगरसेवक सुहास खराडे, शिवाजीराव चौगले, विजय भोसले, मारुती चोथे, रामचंद्र सांगले, एन. वाय. पाटील, सुदाम देसाई,प्राचार्य डॉ शिवाजीराव होडगे, बाजीराव गोधडे, सरपंच शीतलं फराकटे, लखन हेगडे, सुधीर पाटोळे उपस्थित होते.

हमिदवाडा येथील मंडलिक कारखान्यात मार्गदर्शन करताना विलासराव पाटील. व्यासपीठावर चेअरमन माजी खासदार संजय मंडलिक व इतर.

जनता हे मंडलिकांचे टॉनिक होते

विलासराव पाटील म्हणाले, जनता हे मंडलिकांचे टॉनिक होते. जनता हाच ध्यास श्वास व विश्वास होता.जनतेने स्व. मंडलिकांवर भरभरून केलेल्या प्रेमामुळे २००९ची जी लोकसभेची निवडणूक झाली ती देशाला दिशा देऊन गेली हे मंडलिकांवरील जनतेच्या प्रेमाचे मूर्तीमंत उदाहरण आहे. सत्ता भोगण्यासाठी नव्हे जनसामान्यांचे सेवेसाठी आहे याचे नेहमी भान ठेवणारे नैतिकतेचे मूल्य असणारे राजकारणातील दीपस्तंभ असणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

जयसिंगपुरात उद्या स्वाभिमानीची रौप्यमहोत्सवी ऊस परिषद

राजू शेट्टी : ऊस दर व आंदोलनाची दिशा स्पष्ट होणार

केसरी वृत्तसेवा

जयसिंगपूर : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने जयसिंगपूर येथील विक्रमसिंह क्रीडांगणावर शनिवार दि. १० ऑक्टोबर रोजी दुपारी होणाऱ्या रौप्यमहोत्सवी ऊस परिषदेत ऊस दर आणि आंदोलनाची दिशा स्पष्ट करण्यात येईल. या परिषदेला महाराष्ट्र व कर्नाटकातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी माहिती माजी खासदार राजू शेट्टी यांनी नुकतीच पत्रकार परिषदेत दिली.

शनिवारी होणाऱ्या ऊस परिषदेच्या पार्श्वभूमीवर येथे आयोजित पत्रकार बैठकीत शेट्टी पुढे म्हणाले, हंगामात लवकर सुरू झाल्यास शेतकऱ्यांना एकरी १८ ते २२ हजार रुपये इतका तोटा सहन करावा लागणार आहे. त्यामुळे साखर कारखानदारांनी हंगाम सुरू करण्यास घाई गडबड करू नये. कमी पावसामुळे उसाची पूर्ण वाढ होऊ शकली नाही. या उसाचा साखर उतारा कमी लागून यामधून साखरेचे उत्पादन कमी होणार आहे.

याचा तोटा शेतकऱ्यांसह कारखानदाराही सहन करावा लागणार आहे. गेली दोन महिने महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते मंडळी एकत्र येऊन शेतकऱ्यांच्या जनजागृती केली आहे.

चालू वर्षी उसाचे क्षेत्र पाहता सर्वच साखर कारखान्यांचा हंगाम जानेवारीपर्यंत चालणार आहे. सर्वच साखर कारखानदारांना भेटून केंद्र शासनाकडून आपल्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करूया अशी विनंती करणार आहे. चालू हंगामातून देशाला पुरु शकेल एवढीच साखर उत्पादन होणार आहे. कृत्रिम साखर टंचाई कोणामुळे झाली याचा शासनाने शोध घ्यावा तसेच कारखानदार मोठे व्यापारी यांच्या गोडाऊनवर धाडी टाकून ती साखर बाजारात आणावी. साखरेचा आधारभूत किंमत ५० रुपये व इथेनॉलची किंमत ७० रुपये करावी तसेच हंगाम लवकर सुरू केल्यास शासनाने शेतकऱ्याला टनाला पाचशे रुपये थेट अनुदान द्यावे अशी आमची मागणी आहे. १२ ऑक्टोबरला केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी बैठक बोलावली आहे, या बैठकीत हा मुद्दा आम्ही उपस्थित करणार आहे.

या पत्रकार परिषदेस विठ्ठलराव मोरे, डॉ. महावीर अक्कोळे, शांताराम कांबळे, राम शिंदे, सचिन शिंदे, शैलेश चौगुले, शंकर नाळे, विशाल चौगुले स्वस्तिक पाटील, संदीप तिवडे, प्रीतम पाटील उपस्थित होते.

मुरगूड : अंबाबाई मंदिर स्वच्छता मोहीमेत सहभागी सर्जेराव भाट, ओंकार पोतदार, संकेत शहा, प्रकाश परिषवाड, तानाजी भराडे, सागर शहा, प्रफुल्ल कांबळे आदी.

मुरगूडचे ग्रामदैवत अंबाबाई मंदिराची तरुणांकडून स्वच्छता

केसरी वृत्तसेवा

मुरगूड : शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुरगूडचे ग्रामदैवत अंबाबाई मंदिर व मंदिर परिसरात शहरातील तरुणांनी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविली.

सोमवार आणि बुधवार अशा दोन टप्प्यांत ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दररोज सुमारे चार तास श्रमदान करून तरुणांनी संपूर्ण मंदिर परिसर स्वच्छ करून नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाच्या बंबाद्वारे संपूर्ण मंदिर पाण्याने स्वच्छ धुऊन काढले.

सोमवारी सकाळी सहा वाजल्यापासून युवकांनी हातात झाडू, खराटे व स्वच्छतेचे साहित्य घेऊन स्वच्छता मोहिमेस सुरुवात केली. पहिल्या दिवशी मंदिरातील सभामंडप, होळ, गाभारा तसेच मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर बुधवारी संपूर्ण मंदिर अग्निशामक बंबाच्या सहाय्याने पाण्याने धुऊन काढण्यात आले. सकाळी नऊ वाजेपर्यंत ही स्वच्छता मोहीम पूर्ण करण्यात आली. यावेळी मंदिराच्या शिखराचीही स्वच्छता करण्यात आली.

मुरगूडचे ग्रामदैवत असलेले आई अंबाबाई मंदिर हे नव्या दगडी बांधकाम शैलीमुळे मुरगूड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. नवरात्रोत्सव काळात कोल्हापूर जिल्ह्यासह परजिल्ह्यातून व माहेरवाशिणी मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. तसेच आदमापूर येथील बाळूमामा मंदिराच्या अमावस्या यात्रेसाठी येणारे भाविकही मुरगूड येथील अंबाबाई मंदिराला भेट देऊन दर्शन घेतात. या स्वच्छता मोहिमेत सर्जेराव भाट, ओंकार पोतदार, संकेत शहा, प्रकाश परिषवाड, तानाजी भराडे, सागर शहा, प्रफुल्ल कांबळे, अक्षय पोतदार, संकेत भोसले, धनंजय सूर्यवंशी, शिवाजी चौगुले, अमर सुतार, आनंदा रामाणे, चेतन गवाणकर, शैलेश मंडलिक, उद्धव मिरजकर, रणजीत मोहिते, अजित राऊत, विशाल कापडे सहभागी झाले होते.

कुरूंदवाडमध्ये दसऱ्यानिमित्त नदीघाटावर महिलांची लगबग

केसरी वृत्तसेवा

कुरुंदवाड : दसऱ्याचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहरासह ग्रामीण भागात सणाची लगबग सुरू झाली आहे. घराची स्वच्छता, अंगणाची साफसफाई, सजावट तसेच सणासाठी आवश्यक साहित्याची तयारी करण्यासाठी महिलांची धांदल उडाली आहे. नदीकाठच्या पाणवठ्यांवर पुरुष, महिलांची धुणी–भांडी धुण्यासाठी लगबग सुरू असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर घरातील कपडे, चादरी, पडदे, गोधड्या तसेच भांडी स्वच्छ करण्यासाठी महिलांकडून विशेष तयारी केली जात आहे. त्यामुळे नदीकाठचे पाणवठ्यावर पुरुष, महिलांच्या गर्दीने गजबजून जात आहेत. पूर्वी सणासुदीच्या काळात कपडे धुण्यासाठी नदी, विहीर आणि पाणवठे हे ग्रामीण जीवनातील महत्त्वाचे केंद्र होते. आज आधुनिक सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी अनेक गावांमध्ये पारंपरिक पद्धतीने नदीकाठावर धुणी–भांडी करण्याची प्रथा अजूनही कायम आहे. दसऱ्याच्या निमित्ताने नदीकाठच्या घाट व पाणवठ्यांवर पुन्हा जुन्या आठवणींना उजाळा मिळत आहे.

जिल्ह्यात वनराई बंधारे बांधणार : धैर्यशील पाटील

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : वन्यजीव सप्ताहानिमित्त वन विभागातर्फे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील जंगलात वनराई बंधारे बांधण्यात येणार आहेत. या उपक्रमात वनक्षेत्रपालांसहस्थानिकस्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे. याबाबतचे आदेश उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी दिले आहेत.

वन विभागाकडून दरवर्षी वन्यजीवांसाठी जंगल परिसरात पाणवठे तयार केले जातात. याशिवाय यंदा वनराई बंधारे बांधून नैसर्गिक जलस्त्रोतांचे पाणी जंगल परिसरात साठविण्याचे नियोजन केले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :–** जिल्हा तुकडी कोल्हापूर तालुका व पोटतुकडी शिरोळ पैकी कोथळी ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ७४८ पैकी क्षेत्र हे ०.२०आर यासी चतु:सीमा पूर्वेस याच गटातील वसंत बाबगोंडा पाटील यांचे मालकीची उर्वरीत शेतमिळकत, पश्चिमेस गट नं. ७४२ ची मिळकत, दक्षिणेस– सौ. वर्षा गणेश पिराळे यांची मिळकत, उत्तरेस – श्री. विपुल पाटील यांची शेतमिळकत येणेप्रमाणे चतु:सीमेतील शेतमिळकत श्री. वसंत बाबगोंडा पाटील, रा. कोथळी यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे.

मिळकत मालकांनी वर वर्णन केलेली मिळकत आमची अशिल पतसंस्था श्री महावीर ग्रामीण सहकारी बिगर शेती पतसंस्था मर्या. कोथळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेकडे तारण देवून कर्जाची मागणी केलेली आहे. मिळकत मालकांनी वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध निष्कर्जी व निजोखमी असल्याची ग्वाही दिली आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणाचा कसलाही कायदेशीर हक्क हितसंबंध अधिकार, करार, बोजा, गहाण, तारण, कुळ, वारसा अगर अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी संपर्क करावा. दिलेल्या मुदतीत कोणाचीही तक्रार, अगर हरकत आली नाही तर वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध निष्कर्जी बोजा विरहीत असल्याचे समजून आमचे अशिल सदर मिळकत तारण गहाण घेवून कागदपत्राची पूर्ण पूर्तता करून कर्ज देणेचा व्यवहार करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता. ०८/१०/२०२६

ॲड. ए.एम. कुलकर्णी
'सप्तर्षी', इंदिरा हौसिंग सोसा. जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर मोबा. ९२२६४३८५६८

IBC, २०१६ अंतर्गत ५ वा ई–लिलाव विक्री सूचना

मेसर्स प्रतिभा स्कायस्क्रेपर्स प्रायव्हेट लिमिटेड (अवसायन प्रक्रियेत)

नोंदणीकृत कार्यालय: पी.आय. क्र. ४९–५०, रामनगर, ता. करवीर, कोल्हापूर ४१६००५, महाराष्ट्र, भारत

IBC, २०१६ चे कलम ३५ (f) आणि त्यासोबत IBBI (अवसायन प्रक्रिया) नियम, २०१६ चे नियम ३२ व अनुसूची I अन्वये, अवसायन मालमत्ता समूहाचा भाग असलेल्या मेसर्स प्रतिभा स्कायस्क्रेपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या खालील मालमत्तेच्या विक्रीसाठी https://ibbi.baanknet.com या ई–लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे बोली मागविण्यात येत आहेत.

अवसायन नियमावलीतील नियम ३२ (a) ते (d) अंतर्गत विक्री करावयाच्या मालमत्तेचा तपशील	विक्रीची पद्धत	राखीव किंमत रु.	बयाणा रक्कम (EMD) (रु.)	वाढीव बोलीची रक्कम (रु.)
I. जमीन: गट क्र. १८२, ढेकरी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, महाराष्ट्र येथे स्थित, २६७ भूखंड असलेली ३१६७०.८० चौरस मीटर क्षेत्राची मोकळी अकृषिक जमीन.	IBBI (अवसायन प्रक्रिया) नियम, २०१६ च्या नियम ३२ (a) अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेची विक्री	२,४१,०१,०२५	२४,१०,१०२.५	१०,००,०००
II. रोखे आणि आर्थिक मालमत्ता (SFA)	IBBI (अवसायन प्रक्रिया) नियमावली २०१६ नियम ३७ A अंतर्गत सहजपणे रोखीत रूपांतरित न होणारी मालमत्ता.	१,०६,७०,२५२.१७	१०,६७,०२५.२२	१,००,०००
EMD (बयाणा रक्कम) भरण्याची अंतिम तारीख:		२८.१०.२०२६		
ई–लिलावाची तारीख आणि वेळ:		३०.१०.२०२६ (सकाळी १०:०० ते दुपारी १२:०० पर्यंत)		

१. इच्छुक अर्जदार ऑनलाइन ई–लिलावाच्या तपशीलवार अटी व शर्ती, बोली फॉर्म, पात्रतेचे निकष, बोलीदारांचे घोषणापत्र, EMD आवश्यकता इत्यादींसाठी https://ibbi.baanknet.com येथे उपलब्ध असलेल्या 'ई–लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजा'चा संदर्भ घेऊ शकतात.
२. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक कागदपत्रे, ज्यामध्ये 'इन्सॉल्व्हन्सी ॲंड बँकरप्सी कोड'च्या कलम २९ A अंतर्गत पात्रतेबाबतच्या हमीपत्राचा समावेश असेल, ती BAANKNET लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com द्वारे सादर करावीत.
३. संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम BAANKNET लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com द्वारे जमा करावी.
४. वरील कलम २ मध्ये नमूद केलेल्या हमीपत्रात असे नमूद केलेले असावे की, संभाव्य बोलीदार हा संबंधित कायद्याच्या कलम २९ A अंतर्गत कोणत्याही अपात्रतेच्या कक्षेत येत नाही. संभाव्य बोलीदारांनी हे लक्षात घ्यावे की, कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, IBBI च्या परिपत्रक क्र. IBBI/LIQ/८४/२०२५ (दिनांक २८ मार्च २०२५) नुसार EMD जप्त केली जाईल.
५. कृपया लक्षात घ्या की EMD चे पेमेंट BAANKNET पोर्टलद्वारेच केले जावे; यासाठी ई–वॉलेटमध्ये निधी जमा करणे आणि संबंधित लिलावासाठी 'सहभागी व्हा' या पर्यायावर क्लिक करणे आवश्यक आहे. पात्र बोलीदारांची नावे लिक्विडेटरद्वारे निश्चित केली जातील आणि www.baanknet.com या पोर्टलवरील ऑनलाइन ई–लिलावात सहभागी होण्यासाठी ती कळवली जातील. इच्छुक बोलीदारांनी लिलाव पोर्टलवर स्वतःचा युजर आयडी आणि पासवर्ड तयार करावा आणि त्यांची EMD रक्कम पोर्टलच्या ई–वॉलेटमध्ये जमा करावी. ई–लिलाव पोर्टलशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी, BAANKNET (बँक ॲसेट ऑक्शन नेटवर्क)शी संपर्क साधा: ईमेल आयडी support.baanknet@psballiance.com, मोबाईल क्रमांक: +९१ ८२९१२२०२२०.
६. यशस्वी बोलीदारास उर्वरित विक्री मूल्य (म्हणजेच, स्वीकारलेली बोली रक्कम अधिक लागू असलेले इतर कर/शुल्क, ज्यातून प्राप्त झालेली EMD समायोजित केली जाईल) आणि त्यावरील देय व्याज भरण्यासाठी LOI (Letter of Intent) च्या तारखेपासून ९० दिवसांचा कालावधी दिला जाईल.
७. हे स्पष्ट केले जाते की, हे निमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याच्या उद्देशाने आहे आणि यामुळे लिक्विडेटर किंवा कंपनीवर विक्री पूर्ण करण्याचे कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण होत नाही. लिक्विडेशन प्रक्रियेच्या हितासाठी, लिक्विडेटरला ई–लिलावाच्या अटी व शर्ती (वेळापत्रकासह) आपल्या विवेकबुद्धीनुसार वाढवण्याचा, पुढे ढकलण्याचा, रद्द करण्याचा आणि/किंवा त्यांत बदल किंवा वगळण्याचा अधिकार आहे; तसेच लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न देता कोणतीही बोली नाकारण्याचा अधिकार त्यांना आहे.
८. ई–लिलाव केवळ 'जसे आहे तसे', 'जेथे आहे तेथे', 'जे आहे ते' आणि कोणत्याही परताव्याशिवाय या तत्त्वांवर आयोजित केला जाईल.

दिनांक : ०९.१०.२०२६
स्थळ : मुंबई

स्वाक्षरी/–
सुश्री जोविटा रीमा मथियास
लिक्विडेटर – प्रतिभा स्कायस्क्रेपर्स प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशन प्रक्रियेत असलेली)
IBBI नोंदणी क्रमांक: IBBI/IPA-002/IP-N००३३७/२०१७–१८/१०९४१
पत्ता : ३०१, तिसरा मजला, सौरभ बिल्डिंग, डोमिनोज पिझ्झा समोर, चाकाला अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०००९३

नवरात्रोत्सवानिमित्त महालक्ष्मी मंदिर परिसरासह शहरात स्वच्छता मोहीम

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर व स्वच्छता ही सेवा अभियानाअंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख धार्मिक स्थळे, रस्ते व परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविली. आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, गटनेते आदिल फरास यांनी या स्वच्छता मोहिमेत भाग घेऊन मंदिर परिसरात स्वच्छता केली.

या मोहिमेत मंदिर परिसर तसेच परिसरातील रस्ते, फुटपाथ व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. यावेळी तीन ट्रॉली व दोन टिप्परच्या सहाय्याने कचरा व कटिंगचा उठाव करण्यात आला. तसेच टेंबलाई मंदिर परिसरातही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. रंकाळा परिसरात डी–मार्टसमोरील बाजूचा रस्ता व फुटपाथ स्वच्छ करण्यात आला. तसेच प्रभाग क्रमांक अंतर्गत खानविलकर पंप ते महावीर कॉलेज, सेवा रुग्णालय ते सर्किट हाऊस, पितळी गणपती ते डीएसपी चौक मेन रोड या परिसरात स्वच्छता करण्यात आली. ही स्वच्छता मोहिम सहाय्यक आयुक्त स्वाती दुधाने, उपशहर अभियंता सुरेश पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय आरोग्य निरीक्षक नंदकुमार पाटील, आरोग्य निरीक्षक विनोद नाईक, मनोज लोट, अनिकेत सूर्यवंशी, सुरज घुणकीकर, आदित्य पवार, भूमी कदम यांच्यासह मुकादम व महापालिका कर्मचाऱ्यांनी राबविली.

कोल्हापूर : आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, गटनेते आदिल फरास यांनी मंदिर परिसरात स्वच्छता केली.

स्वच्छता विभागामार्फत विशेष नियोजन

कोल्हापुरातील प्रभाग क्रमांक अंतर्गत सायबर चौक ते शेंडा पार्क मेन रोड या मार्गावरही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नवरात्रोत्सव काळात शहरातील प्रमुख धार्मिक व सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले आहे.